## प्रेसनोट

दि. १५/०२/२०२३

**मृत व्यक्तीचे कामगार विम्याचे पैसे मिळवून देण्यासाठी लाच मागणी करुन स्विकारले प्रकरणी दोन खाजगी व्यक्तींवर कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ अ, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - २१ वर्षे |
| आरोपी नाव | खाजगी व्यक्ती १) योगिता अरुण शेंडगे, वय ४० वर्ष, रा. लक्ष्मीनगर, थेरगांव, पुणे.<br>२) फारुख हनिफ पठाण, वय ५६ वर्ष, रा. भाऊ पाटील चाळ, बोपोडी, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,००,०००/- रुपये (एक लाख रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये. |
| पडताळणी दिनांक | १४/०२/२०२३ |
| सापळा दिनांक | १५/०२/२०२३ |

ठिकाण :- शिवाजीनगर, पुणे येथील कामगार कार्यालयाचे आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची आई फेब्रुवारी २०२२ मध्ये मयत झाली असून तिची महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याण मंडळामध्ये बांधकाम मजूर म्हणून नोंदणी असल्याने तिचा कामगार विमा म्हणून मिळणारी २,३४,०००/- रुपये रक्कम कामगार कार्यालयाकडून मिळवून देण्यासाठी योगिता शेंडगे यांनी तक्रारदार यांचेकडे १ लाख रुपयांची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, क्र. १ योगिता शेंडगे यांनी कामगार कार्यालयाकडून रक्कम मिळवून देण्यासाठी साहेबांना पैसे द्यावे लागतात असे सांगून १ लाख रुपयांची मागणी करुन, त्यापैकी ॲडव्हांन्स म्हणून १०,०००/- रुपयांची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली. शेंडगे यांच्या सोबत असलेले क्र. २ फारुख पठाण यांनी त्या लाच मागणीस सहाय्य केले म्हणुन त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner